महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/१५२/(९८)/प्र.क्र.३५९/२००८/का.१, दिनांक :- ४ फेब्रुवारी, २०१०.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट बोर्ड, के.सी. कॉलेज बिल्डिंग, दिन्शां वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.११.०७.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जास अनुसरुन तत्कालीन सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग यांनी संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सुनावणीअंती दिनांक १२ नोव्हेंबर, २००७ रोजी सदर संस्थेस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित केलेल्या तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८पासून पुढील तीन वर्षाकरिता भाषिक (सिंधी) अल्पसंख्याक दर्जा प्रदान केला होता.

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक:अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ च्या परिच्छेद (१०) मध्ये विहित तरतूदीनुसार सदर संस्थेने सादर केलेल्या दिनांक २१.११.२००९ च्या अर्जास हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट बोर्ड, मुंबई या शैक्षणिक संस्थेस याद्वारे भाषिक (सिंधी) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन

टी.एफ. थेकेकरा

( टी. एफ. थेकेकरा )
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

Government of Maharashtra
Competent Authority and Principal Secretary
Minority Development Department,
Mantralaya, Mumbai 400 032.

No.: AS-2008/152/98)/P.No.359/2008/Ka.1, Date :- 4 February 2010.

**Minority Status Recognition Certificate**

Hyderabad (Sindh) National Collegiate Board, K.C. Pursuant to the application submitted by the Educational Institution, College Building, Dinsha Vaccha Road, Churchgate, Mumbai on 11.07.2007 for approval of the application of their institution as Linguistic Minority Educational Institution, the then Competent Authority and Principal Secretary and Special Inquiry Officer-2, General After the hearing held by the administration department with the office bearers of the concerned organization on 12th November 2007, the government decision, general administration department, no. As per the provisions prescribed vide June 11, 2007, linguistic (Sindhi) minority status was granted for the next three years from the academic year 2007-08.

Government Decision, Minority Development Department, No. AS-2008/P.No.133/2008/ Ka.1, dt. The application dated 21.11.2009 submitted by the said institution in accordance with the provisions prescribed in paragraph (10) of 4th July, 2008 is hereby declared to the Hyderabad (Singh) National Collegiate Board, Mumbai as a Linguistic (Sindhi) Minority Educational Institution.

This certificate will be applicable only for the state of Maharashtra. The linguistic minority status granted to the said institution shall be applicable to all academic branches operated by the institution.

The Linguistic Minority Status hereby granted to the above mentioned educational institution shall be valid from the academic year 2009-10. It will be mandatory for the concerned organization to consistently and specifically fulfill the criteria and conditions prescribed by the Minority Development Department, Government Decision No.-2008/P.No.133/2008/Ka.1, dated 4th July 2008.

development,

SMT. M. M. K. COLLEGE * BANDRA (W), MUMBAI-50. *